# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जावक क्रमांक: तंशिविकापु/विवि/गुनिसा शिष्यवृत्ती/२०१९/ 3748 दिनांक : ११.०९.२०१९

प्रति,
प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता,
(मान्यताप्राप्त तांत्रिक व व्यावसायिक पदविका, पदवी व
पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणा-या संस्था)
पुणे विभाग.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी National Scholarship Portal वरील केंद्रशासन पुरस्कृत गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती (Merit cum Means Based Scholarship) योजनेच्या अंमलबजावणीबाबत...**

संदर्भ : १) तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/संस्था-पत्र/MCM/२०१९/३४० दि २०.०७.१९.
२) तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/संस्था-पत्र/MCM/२०१९/३८२ दि. ०९.०८.१९.
३) या विभागीय कार्यालयाचे पत्र जा.क्र. तंशिविकापु/विवि/२०१९/३३६७ दिनांक १३.०८.१९.
४) तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/विका-पत्र/MCM/२०१९/४११ दि. ०७.०९.१९.

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे कार्यालयाच्या अधिनस्त तांत्रिक व व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणा-या सर्व संबंधीत संस्थांनी त्यांचे संस्थेत शिक्षण घेत असलेल्या मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी केंद्रशासन पुरस्कृत गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी National Scholarship Portal (www.sholarships.gov.in) ऑनलाईन रजिस्ट्रेशन करुन त्याची साक्षांकीत प्रत तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे मंजूरीसाठी साठी पाठविण्याबाबत सुचित केलेले आहे. सदर मंजूरीनंतर संस्थांच्या नोडल ऑफीसरच्या मोबाईल नंबरवर ऑनलाईन प्रणालीद्वारे संस्थेला पासवर्ड प्राप्त होणार आहे. त्याचा वापर करुन संस्थांनी Institute Profile अद्ययावत करावयाचे आहे.

अद्यापही विभागातील ब-याच संस्थांनी त्यांचे रजिस्ट्रेशन फॉर्म ऑनलाईन भरून त्याची साक्षांकीत प्रत तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचेकडे सादर न केल्याने त्यांना पासवर्ड दिला गेलेला नाही. या पत्राद्वारे संबंधीत संस्थांना पुनश्च: कळविण्यात येते की, National Scholarship Portal वर संस्था नोंदणीची मुदत केंद्रशासनाने **दिनांक १५.०९.२०१९** पर्यंत वाढविलेली आहे.

या अनुषंगाने सर्व संस्थांना कळविण्यात येते की, ज्या संस्थांनी National Scholarship Portal वर अद्यापपर्यंत संस्था नोंदणी अर्ज भरून (Registration Form) भरुन State Nodal Officer कडून मंजूरी घेण्याची कार्यवाही पूर्ण केलेली नाही अशा संस्थांनी, केंद्र शासनाच्या National Scholarship Portal (www.sholarships.gov.in) वर संस्थेच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Institute Login अंतर्गत उपलब्ध असलेला संपूर्ण Registration Form काळजीपूर्वक भरून त्याची साक्षांकीत प्रत, AISHE Code च्या Certificate फोटोप्रतीसह मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचेकडे मंजूरीसाठी **वाढीव मुदतीपूर्वी** जमा करावी. अन्यथा या कारणास्तव संस्थेत शिकणा-या विद्यार्थ्यांना National Scholarship Portal वर उपलब्ध योजनेस अर्ज करता आला नाही तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

दहावी व बारावी नंतरचे पदविका अभ्यासक्रम हे केंद्र शासनाच्या पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती अंतर्गत येत असल्याने पदविका अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांनी संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. सेंट्रल बिल्डींग, पुणे (State Nodal Officer) यांचेकडे संपर्क साधून रजिस्ट्रेशन फॉर्मची साक्षांकीत प्रत जमा करावी (www.dhepune.gov.in).

सोबत : संदर्भ क्रमांक ४ चे पत्र.

Gaikwad 11.9.19
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

Flc


# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई. ४०० ००१

दूरध्वनी क्र. २२६१७९६९ फॅक्स क्र. २२६९०००७

E-mail: desk१८@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


**स्मरणपत्र – २ /अतितात्काळ -- स्पीडपोस्ट/ईमेलद्वारे** का.क्र.१८/तंशिसं/वि.का.पत्र /MCM/२०१९/ ४११

दिनांकः- ७/०९/२०१९

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नागपूर / अमरावती / नाशिक / औरंगाबाद.

**विषय :- सन २०१९-२० साठी National Scholarship Portal वरील केंद्रशासन पुरस्कृत गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती (Merit cum Means Based Scholarship ) योजनेच्या अंमलबजावणीबाबत...**

**संदर्भ :-** १. या संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/संस्था-पत्र /MCM/२०१९/३८२ दि. ०९/०८/२०१९

२. या संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/वि.का.पत्र /MCM/२०१९/३९३ दि. २३/०८/२०१९

३. मिनिस्टरी ऑफ मायनॉरिटी अफेअर्स, न्यू दिल्ली यांचे पत्र No.8-3/2019-SS दि.०५/०९/२०१९

तंत्रशिक्षण संचालनालय, म.राज्य, मुंबई (State Nodal Officer) यांचेमार्फत मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील तांत्रिक व व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी **केंद्रशासन पुरस्कृत गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती ( Merit cum Means Based Scholarship ) योजना** राबविल्या जाणा-या योजनेच्या लाभासाठी पोर्टलवर संस्था नोंदणीकरिता या संचालनालयामार्फत संदर्भ क्र.१ अन्वये सूचित करण्यात आलेले आहे.

तसेच संदर्भ क्र. २ अन्वये या संचालनालयांतर्गत विभागीय कार्यालयांनाही त्यांच्या अखत्यारित येणा-या सर्व संबंधित संस्थांना बोलावून ज्या संस्थांकडून पोर्टलवर अद्याप संस्था नोंदणी करण्यात आलेली नाही अशा संस्थांना ताकीद देऊन तातडीने कार्यवाही पूर्ण करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे. तरीही, ब-याच संस्थांकडून अद्याप केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( www.scholarships.gov.in ) वर नोंदणी होणे बाकी आहे. त्यामुळे केंद्र शासनाने संदर्भ क्र. ३ अन्वये NSP पोर्टलवर संस्था नोंदणीची मुदत वाढवून **दिनांक १५/०९/२०१९** पर्यंत दिली आहे.

उपरोक्त विषयाबाबत पुनःश्च कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ व २ च्या पत्रानुसार कार्यवाही करुन, ज्या संस्थांनी NSP पोर्टलवर अद्यापपर्यंत संस्था नोंदणी अर्ज (Registration Form) भरुन, स्टेट नोडल ऑफीसरकडून मंजूरी घेण्याची कार्यवाही पूर्ण केलेली नाही अशा संस्थांनी, केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( www.scholarships.gov.in ) वर संस्थेच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Institute Login अंतर्गत उपलब्ध असलेला संपूर्ण Registration Form काळजीपूर्वक भरुन त्याची साक्षांकीत प्रत, AISHE Code च्या Certificate फोटोप्रतीसह संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.राज्य, मुंबई यांचेकडे मंजूरीसाठी **वाढीव मुदतीपूर्वी** जमा करावी अन्यथा या कारणास्तव संस्थेत शिकणा-या विद्यार्थ्यांना National Scholarship Portal वर उपलब्ध योजनांकरिता जर अर्ज करता आला नाही तर त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

( डॉ. अभय वाघ. )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

**महत्त्वाची टिपः:**

दहावी व बारावी नंतरचे पदविका अभ्यासक्रम हे केंद्र शासनाच्या **पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती** अंतर्गत येत असल्याने पदविका अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांनी *संचालक, उच्च शिक्षण संचालनालय,सेंट्रल बिल्डिंग, पुणे* (State Nodal Officer) यांच्याकडे संपर्क साधून Registration Form ची साक्षांकीत प्रत जमा करावी. (संकेतस्थळ :www.dhepune.gov.in )

वि.वि
११.९.१९

(कृ.मा.प.